डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ १०८ /२०२६ दि. २३ /०५/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत श्री. सुमेध संजय हिंगे. सदस्य:– हिंदु समेलन समिती शिव मार्केट वस्ती यांचे वतीने विराट हिंदु समेलन कार्यक्रम दिनांक २३/०५/२०२६ रोजी सांयकाळी १८:०० ते रात्री २१:०० वाजेपावेतो डोंबिवली पुर्व आप्पा दातार चौक ते बाबासाहेब जोशी पथ कॉस रोड/गुलशन ज्युस, फडके रोड डोंबिवली पुर्व या परिसरात आयोजित केला आहे. सदर कार्यक्रमास डोंबिवली येथील पुर्व फडके रोड येथे वाहतुक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद–	**१) गणपती मंदीर गेट नेहरू रोडकडुन फडके रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना आप्पा दातार चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**
पर्यायी मार्ग–	**सदरची वाहने सरळ तुळशी स्विट कॉर्नर मार्गे छेडा रोड अथवा गणपती मंदीर रोड अथवा नेहरू रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.**
प्रवेश बंद–	**२) छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना आप्पा दातार चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**
पर्यायी मार्ग–	**सदरची वाहने सरळ गणपती मंदीर समोरून नेहरू रोड मार्गे डावे वळण घेवुन बाबासाहेब जोशी मार्गे, टिळक रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.**
प्रवेश बंद–	**३) बाबासाहेब जोशी मार्गे/गुलशन ज्युस कट मार्गे आप्पा दातार चौक फडके रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बाबासाहेब जोशी मार्गे/गुलशन ज्युस कट येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**
पर्यायी मार्ग–	**सदरची वाहने बाबासाहेब जोशी मार्गे अथवा नेहरू रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.**
नो पार्कींग–	**फडके रोडवरील आप्पा दातार चौक ते बाबासाहेब जोशी मार्गे कट दरम्यान रस्ता "नो पार्किंग" करण्यात येत आहे.**
पर्यायी पार्किंग–	**सदर रोडवरील वाहन चालकांना बाबासाहेब जोशी मार्गे कट ते अंबिका हॉटेल कॉर्नर दरम्यान पी १, पी २ पार्किंग उपलब्ध आहे.**

सदर अधिसूचना दिनांक २३/०५/२०२६ रोजी सांयकाळी १८:०० ते रात्री २१:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर